म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
१००

# प्रभा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८५३
१९२८

ता. १ सप्टेम्बर १९२७

रविकिरणमण्डळ

रविकिरणमण्डळाचें दहावें पुस्तक

# प्रभा

ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रगति वाचनालय

“ सङ्गीत–काव्य–सुम मोद मनास देई
मोदांतही परि उणीव मला गमे ही
व्हायास रम्यतर रम्य कलाविलास
कोठें मनोज्ञ सहवास तुझा जिवास ? ”

........................................स

........................................कडून

........................................भेट

38483

* * * * * *

ता. ९ सप्टेंबर १९२७ इसवी

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| विश्वबिन्दु | १ | अभिसारिका | ३२ |
| प्रतिभा | ८ | पत्रांतील फुलें | ३३ |
| श्रीशारदावन्दन | १४ | प्रेमांतील अद्वैत | ३४ |
| लिहूं कुणावर कविता ? | १५ | बाळशिवाजीस | ३५ |
| वृद्ध कवि | १६ | बुल्बुलास | ३५ |
| कवि कातळ | १८ | निराशेंतील इच्छा | ३६ |
| घाटांतील खुणा | १९ | ऐकव तव मधु बोल | ३७ |
| सुमनावलि | २० | मैत्रीची स्मृति | ३८ |
| नौकाविहार | २१ | बन्दिवान् गरूड | ३९ |
| फेराचें गाणें | २२ | गाउं त्यांना आरती | ४० |
| शूर्पणखा | २४ | उपासक | ४० |
| न्यारिचा वकूत | २५ | मनाची आग | ४१ |
| भलंरी | २५ | हुरहुर | ४२ |
| एक विद्यार्थिनी | २६ | मृत्यूस | ४३ |
| बालगन्धर्वास | २७ | गौरीशङ्कर आणि मानव | ४४ |
| अन्धारांतील बाण | २८ | हाकाटी | ४५ |
| कृतज्ञता | २९ | दोन अभङ्ग | ४७ |
| सङ्गमोत्सुक डोह | ३१ | पाणपोई | ४८ |



सम्पादक व प्रकाशक
श्रीधर बाळकृष्ण रानडे
४६१ शनवार, पुणें.

मुद्रक
अनन्त सखाराम गोखले
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

नों. नं.: 103

कविवर्य

## भास्कर रामचन्द्र ताम्बे

यांस

सादर समर्पण

# प्रस्तावना

मण्डळाचें १ लें पुस्तक–किरण–प्रसिद्ध झाल्यापासून चार वर्षांनीं हें १० वें पुस्तक–प्रभा–प्रसिद्ध होत आहे. यांत विशेष म्हणजे 'न्ह्यारीचा वकूत' व 'भलरी' हीं भावगीतें नाट्यदृष्टीनें इष्ट म्हणूनच बुद्ध्या जानपद आर्ष भाषेंत रचिलेलीं आहेत; व 'शूर्पणखा' या गीताची भाषा आर्ष पण घरगुती बायकी उच्चारसरणीची आहे. उलटपक्षीं 'फेराचें गाणें' यांतील भाषा नागर पण छन्द मूळचाच जानपद आहे. विविधवृत्तांना दिलेलीं नांवें 'छन्दोरचना' या ग्रन्थांतील आहेत. ज्या लेखनसुधारणेस श्री० बा. अ. भिडे यांनीं 'विरह-तरङ्गा'च्या परीक्षणांत मान्यता दिलेली आहे, ती अनुस्वारापुरती सुधारणा आतां सर्वत्र अमलांत आणली आहे. मण्डळाच्या कृतींवर झालेल्या साधक-बाधक टीकांचा मण्डळ साभार स्वीकार करीत आहे. रसज्ञ सहानुभूति, न्याय-निष्ठुरता, पक्षाभिनिवेश, पूर्वग्रहदूषित शिष्टपणा, असूया, अनुकरणबुद्धि इत्यादि तारकमारकवृत्ति जगांत कशा भेळीनें भरल्या आहेत याचा अनुभव पुढील कार्यास खास मार्गदर्शक होईल.

गेल्या चार वर्षांत कविता, लघुकथा, नाट्यछटा, नाट्यप्रवेश, चर्चात्मक निबन्ध, छन्दशास्त्र इत्यादि क्षेत्रांतील कामगिरी प्रसिद्ध झाली. या काळांत एक सदस्य सोडून गेले, तर दुसरे लाभले, पण तिसरे दिवङ्गत झाले. पुढें काय होईल काय साङ्गावें ! परन्तु मण्डळ स्नेहाच्या पायावर आणि मूलतः वाङ्मयिक सहकारासाठीं म्हणजे विचारविनिमयासाठींच स्थापित असल्यानें जीं अन्तर्बाह्य सङ्कटें कोणत्याही मण्डळाला मारक होण्याचा सम्भव असतो, त्यांची बाधा मण्डळास अजून झालेली नाहीं, व पुढें होणार नाहीं अशी आशा आहे. वैयक्तिक वा साङ्घिक भावी कामगिरी अशीच ध्येयमार्गी व प्रागतिक राहील ही शुभेच्छा आहे. एखाद्या जीवास मनोविनोदन, शान्ति, स्फूर्ति किंवा एखादी उदात्त भावना यांचा लाभ झाला तरी मण्डळाच्या कृतीचें सार्थक होईल.

डेक्कन कॉलेज, पुणें,
ता. १ सप्टेम्बर १९२७

श्रीधर बाळकृष्ण रानडे
सम्पादक

# प्रभा

## विश्व–बिन्दु



...परवां रात्रीचें स्वप्न विलक्षणच ! अनेक रङ्गीत सूर्य एकमेकांभोंवतीं फिरताहेत. एकमेकांवर आदळून फुटून वितळून प्रचण्ड बाष्पीभूत तेजोमेघ बनत आहेत. परिवारांतल्या अगणित पृथ्व्यांचा चक्काचूर होऊन असङ्ख्य जीव होरपळून प्रार्थनेचा निष्फल टाहो फोडीत मूलतत्त्वांत विलीन होत आहेत, आणि घटनेंतील हा संहार पहात एक विराट पुरुष किङ्कर्तव्यमूढ, चिन्तातुर खिन्न होऊन उदासवाणा निश्चल बसला आहे !!–कालचें तर

जास्तीच हृदयविदारक आणि चटका लावून सोडणारें !...वातावरणाच्या तळीं बुजबुजणाऱ्या परार्धों जीवजन्तूंतून आपल्या समानधर्मी जिवलगास शोधून काढून, आपल्या अस्तित्वाची जाणीव व भावी जीवितक्रमाची सूचना देण्याचा प्रयत्न करूं पाहणारा विरलसूक्ष्मप्रकाशदेही आत्मा असाच खिन्न होऊन अन्तरिक्षांतून अनिमिष दृष्टि लावून पहात आहे. काचेच्या आवरणांतील निर्वात पोकळींतून दृष्टीवाचून इतर ज्ञानेन्द्रियें गलित झालेला पारदर्शक जीव व्यसनग्रस्त आम्हाकडे पहात आहे ! उञ्ची नसून लाम्बी व रुन्दी एवढीं दोनच परिमाणें असलेले पदार्थ मधील रेखेपलीकडील सृष्टि जाणूं शकत नाहींत. चतुर्थ परिमाण प्राप्त झालेला आत्मा विकल चित्तानें करुण दृश्य पहात बसला आहे.......

घराजवळच असलेल्या प्रयोगशालेकडे जातांना आज किती दुश्चिन्हें व भास झाले ! कारञ्जावर तरङ्गणारें इन्द्रधनुष्य, सूर्य जरा वर सरकतांच नाहींसे झालें. धूरगाडीच्या तेलानें मार्गावर उमटलेलीं रङ्गवलयें जरा दूर जातांच अदृश्य झालीं. काल सन्ध्याकाळीं ताटव्यावर गुङ्गत असलेलीं फूलपांखरें माघांतल्या कडक थण्डीनें गारठून पडलेलीं, जमीनीवर विखुरलेल्या पाकळ्यांतून ओळखणें कठिण होतें. तळमजल्यावरील प्रकाशशास्त्राचा चालू प्रयोग सहज डोकावून पाहतां मन जास्तच खिन्न झालें. भास कोणता आणि सत्य कोणतें ? जें दिसलें तें भासमय ! ध्वनि ती लाट; प्रकाश, उष्णता, वीज त्या लहरी ! सर्व जड पदार्थ चिद्द्रव्याच्या गतिमान् कणांच्या भिन्न, रूपान्तरसुलभ सूक्ष्मसूर्यमालिका !! दृश्य तें अदृश्य-अदृश्याचा अनन्त पसारा ! मी नाहीं, तूं नाहीं, तूं तें मी होईल; आहे तें नाहीं, हरपलें तें तेथेंच आहे ! माया...आणि...ब्रह्म !! जीवाला समाधान ? छे !......

पहिल्या मजल्यावरील शोधक विद्यार्थ्यानें हांक मारून दाखविलें--द्रवाचा नयनमनोहर रङ्ग अदृश्य झाला. द्वादशपैलू स्फटिकाची प्रथम ओङ्गळ पूड मग वाफ झाली. द्रवरूप हवा थण्ड उकळी फुटत पाकळ्यांचा भुगा करून पूर्ववत् अदृश्य झाली. गोडाचें कडू, विषाचें अमृत बनलें. नाशवन्ताचें अमर झालें !--असेल ! पण मला रुचलेले गुणधर्म त्या बदललेल्या

स्थितींतही असतील का ?...द्रव, रङ्गवलयें...प्रकाशदेही...होरपळणारें जग...विराटदेही...मी जड पावलानें वरच्या पायऱ्या चढूं लागलों.

"अहाहा ! काय नवल ! घाण डबक्यांतील कुजक्या पाण्याच्या एकाच थेम्बांत केवढें जग सामावलें आहे ! झाडें, वेली, चिमुकलीं फुलें सुद्धां !!... सोनेरी नावा डुलत वक्रगतीनें चालल्या आहेत. किती सुस्वरूप आनन्दी जीव सहल करीत आहेत, घण्टाजीव, चक्रमुख मुखांतील पक्ष्मजाल फिरवीत गम्मत बघत आहेत !" एक पारशी विद्यार्थिनी विस्मयानें उद्गारली.

आपल्या सूक्ष्मदर्शक यन्त्रांतून पहात चित्रें काढणारा शेजारचा पठाण विद्यार्थी भीषण विकट हास्य करून म्हणाला, 'मी एक प्रचण्ड विराटस्वरूप शक्तिमान् अतर्क्य प्राणी, यांचेकडे पहात आहें. करमणुकीखातर निमिषार्धांत थेम्ब पुसून, तापवून, विषबिन्दूचा प्रलय करून यांचें चिमुकलें जग नामशेष करूं शकेन, याची या मूर्ख निर्बलांना कल्पना तरी आहे का ?"

"आईग ! किती अघोर सैतानी वृत्ति ही !" दुसरी विद्यार्थिनी कळवळून शहारे झाडून म्हणाली, "गरीब बापडे ! ज्यांचा एकेक अणु विश्वाएवढा, असे आमच्यासारखे भले बुरे जीव सृष्टींत आहेत, याची यांना जाणीव तरी ?"

"अज्ञानच बरं बाई ! नाहीं तर या जीवांना सुखाचा एक लक्षांश क्षण-पण तोही अनुभवतां आला नसता." तिसरीनें डोळ्यांतून केर काढून सुस्कारा टाकून, हातावर कपाळ टेंकून पूर्ववत् सूक्ष्म सृष्टीचें अवलोकन सुरूं केलें.

होरपळणारें जग......विराटदेही....

तास सम्पत आला. मी जड अन्तःकरणानें माझ्या सूक्ष्मदर्शकांतून पाहूं लागलों. अहाहा ! येथेंसुद्धां गृह-प्रणय, शान्ति, समाधान आणि आत्मैक्य ! शैवालतन्तुकुञ्जाआडून ही कोण बरं वाट पहात आहे ? वालुकाकणांतून कष्टानें वाट काढीत हा कोण प्रवासी घरीं येत आहे ? अल्पजीवी जीवाला हा अत्यल्प कालावधि किती विरहव्याकुल करीत असेल ? झाली. दृष्टिभेट झाली. शैवालाचा अन्तःपट सारून प्रणयनिर्लज्ज रमणी पुढें धांवली...शुभ मंगल...टाळी......!

हाय हाय! काय केलें हें मी! टाळीच्या आवाजानें हादरलेल्या हवेच्या कम्पनानें काचेवरील थेम्बांत प्रचण्ड खळबळ होऊन, शैवालवेली उन्मळून पडल्या, पाण्याच्या लाटेनें दोन्ही जीव भिन्न दिशेस झुगारले गेले. आतां काय करूं? अल्पजीवी जीव...किती अन्तर...अपुरीं व्यङ्ग इन्द्रियें—पुन्हा यदृच्छेनें जवळ येण्यास केवढा कालावधि! ईश्वरा! कशी यांची धडपड तगमग चालली आहे! अरे वेड्या! ती बघ तेथें जवळच आहे. इन्चाचा सहस्रांशही अन्तर नाहीं रे! पण तें तुला योजने दूर झालें. तशांत हें शैवालांचें निबिड अरण्य! हरे राम—!...

...झालें! माझ्या ऊन सुस्काऱ्याच्या झुळकीसरशी मधील पाणी आटून खण्ड पडला! तुझ्या दृष्टीनें ती दुसऱ्या जगांतील झाली...दोघांतील जीवनमार्गाचा धागा तुटला. तुम्ही दोघे जगाच्या कडेला जाऊन डोकावूं लागलां तरी—स्वप्नांत दिसणें दूरच—भेट कशी होणार! काय करूं? होरपळणारें जग...विराट पुरुष...मी तोण्ड फिरवून फळ्याकडे वळलों.

'गुरुजी! तुमच्या काचेवरचें पाणी आटत होतें, म्हणून मीं थेम्बभर डबक्यांतलेंच पाणी आंत घालून, शेजारच्या जलपात्रांतून केशाकर्षक जलपूरक वातही जोडली आहे. खोलींतील उष्णतेनें पाणी आटलें तरी सारखा पुरवठा राहील. आम्ही आमचे थेम्ब परत मूळच्या पाण्यांत टाकले. घण्टा झाली. आम्ही जातों'.

'उद्यां सामन्यामुळें सकाळींच तास आहे. गुड् नाइट!' मुलं गेलीं...गुड् नाइट ... कसली गुड् नाइट ... शिवरात्र ... एकादशीच्या घरीं ... शेली! शेली! मी विमनस्कपणें यन्त्रांत डोकावलें, जैन विद्यार्थ्यानें सहजगत्या नवीन थेम्बाबरोबर देवदूताची कामगिरी केली. रमण-रमणी जवळ आलीं होतीं. नवीन थेम्बाबरोबर आलेल्या दोन चक्रशैवालांचें सम्मीलन सुरू झालें होतें. मृतशैवालपेशींतील जन्तूच्या जीवनकलहामुळें एक पेशी सुकाणूहीन नावेप्रमाणें स्वैरसञ्चार करीत होती. एका तन्तूवर आपलें पुच्छ रोवून एक चक्रमुख मुखावरील पक्ष्मचक्रभ्रमणानें आवर्तावलि उत्पन्न करीत होता ... मदतनीस गेला. सायङ्काळ झाली. खुल्या मैदानांतील वाद्यवादनमण्डपांत वादन, धूरगाड्यांची घरघर सुरू झाली. शेजारच्या सार्व-

जनिक सभागृहामध्यें पाश्चात्य तन्तुवाद्यें एकमेळीनें कम्प पावूं लागलीं. विद्युद्दीप लागले. जवळच घर, पण कान्तारांत जावेंसें वाटेना. विद्युद्दीपाच्या प्रकाशांत सूक्ष्म दिव्य जग पाहतां पाहतां तहानभूक विसरली, भान हरपलें.......

पाणी भरपूर, पण दुसऱ्या आपत्ति-विघ्नें थोडींच टळणार ? मत्सरी प्राणी, दूर अन्तरावरून पाठलाग करणाऱ्या केसाळ बुभुक्षित कृमींपासून बचाव करून जीव घेऊन धांवणाऱ्या जीवांच्या झुण्डी, दोघांना ढकलून दूर करून जात. वळवळणाऱ्या दोन सूतकृमींच्या प्रणयचेष्टेंत यांचे देहच भग्न होणार होते. एका कुजणाऱ्या वेलीमुळें पाणी दूषित होत चाललें होतें. या दोघांना अलगत उचलून दुसऱ्या सुन्दर सुखमय जगांत नेऊन मला सोडतां येतें तर...पण त्यांचें जग माझा थेम्ब ! माझ्या बलाचा, राक्षसी देहाचा काय उपयोग ! अनुकम्पा, दया, सहानुभूति, सदिच्छा विफल–विफल... !

बिन्दु विश्वाएवढा ! प्रचण्ड—प्रकाशवर्षांचा मानदण्ड अपुरा पडणारें विश्व बिन्दुमात्र !...अन्तरिक्षात्मा...विराटपुरुष... !

मी सज्जांत उभा राहिलों ! अमावास्येचें नभोमण्डल...विश्वांचा समूह खेदानें माझ्याकडे पहात होता. खालीं माना घालून उभ्या असलेल्या विद्युद्दीपांच्या प्रकाशवलयाभोंवतीं दुःखाचें अन्धुक धुकें दाटलें होतें. रात्रीच्या निर्मनुष्य एकान्त स्थलीं समोरचा सागर, उधाणाच्या लाटा उसळून सहानुभावी आक्रोश करीत होता...सुख...दुःख...भास कोणता ! पुढें तरी सत्य कशावरून !...धुकें...धुकें...हूः !

मी परत जाऊन पाहिलें...हें काय विघ्न ! चक्रमुखाच्या भोंवऱ्यांत रमणी सांपडली...अरेरे ! हमखास अचूक कालमुखांत जाणार ! भोंवरा जोरानें फिरूं लागला ! रमणा पाहतोस काय ? घाल उडी, सोडव तिला ! स्वतांचा बळी देऊन यमाची भूक शमवून तिला वांचीव ! तूं कसला सोडविणार ? अर्ध सम्मीलित झालेला–बाह्य जगाला विसरलेला प्रेमवेडा तूंही करालमुखांत चाललास–धन्य तुमची...मरण आहेच–तेंही एकदांच...जा असेंच शाश्वत सुखाकडे ...न जाणों, क्षणाचेंही अन्तर चिर-प्रवासांत कायमचीच ताटातूट ठेवील...! ...दैवानेंच खैर केली...कोणी तरी मूळ कुरतडल्यामुळें निराधार वेली-

बरोबर चक्रमुख वहात गेला. सङ्कटाची वावटळ गेली. युग्म पुन्हा सम्मीलित होऊं लागलें. अरेरे ! क्षणैक सुखाचा आभास करणारें—एक सङ्कट दूर करून स्वतःच रौद्ररूप प्रकट करणारें धूड—हा तन्तुबाहु आपल्या शराङ्गुलि पसरून बळी शोधूं लागला. हें प्रेमवेडें प्रणायान्ध जोडपें क्षणार्धांत विषदिग्ध बाणांनीं घायाळ होणार खास—त्या जैन विद्यार्थ्यानें उपकार केला पण नवीन थेम्बांतून यमदूतच पाठविला. बाहु जवळ येऊं लागले. काय करूं ! थेम्ब पुसूं ! आम्लबिन्दूनें राक्षसनिर्दलन करूं ! पण त्याच्या अगोदरच हें हळुवार दम्पती गतप्राण होईल ! कसें सोडवूं ? शक्तिमान् पण निर्बल, दयार्द्र मन, पण शरीर कार्यास अक्षम...विराट पुरुष !...निराशेनें डोळे मिटून मी मेजावर मस्तक टेकलें.

पहाटेच्या थण्ड वाऱ्यानें मी जागा झालों. कुत्रा पायाशीं येऊन निजला होता. खालीं बागेंत रातराणीचा गन्ध दरवळत होता. खिडकीवर चढलेल्या जाईच्या डुलणाऱ्या हिमधवल गुच्छावर पतङ्ग तद्रूप झाले होते. शान्त मङ्गल समयीं प्रेमी जीव सुखनिद्रेंत मग्न होते. मी दचकून पाहिलें...रमणरमणी तन्तुबाहूच्या अजगरविळख्यांत सांपडली होती; पण एक नाजूक सोनेरी जलदेवी आपल्या सूचिमुखानें तन्तुबाहूच्या मर्मावर आघात करीत होती. दोन बाहु तुटून पडले होते. इतर त्वेषानें वळवळत होते. सन्धान चुकल्यामुळें बहुतेक शर वांया जात होते. जलदेवी गनीमी काव्याचा अवलम्ब करीत होती. निळसर हिरव्या दोलाशैवालावर शर अडकून उलट त्यांचेंच जाळें तन्तुबाहूसभोंवतीं वेढलें जाई. अनपेक्षित स्थलीं विद्युद्गतीनें जलदेवी व्रण करीत होती...

...तिच्या कर्मयोगास यश चिन्तण्यापेक्षां दुसरें विधायक असें, मी काय करूं शकणार ?...उजाडलें, उन्हें पडलीं, तरी माझा डोळा लागलेलाच.

सकाळचा वर्ग ! विद्यार्थी आले. माझें ताटकळत बसलेलें ध्यान पाहून कोणास अभिमान वाटला, कुणाला कींव आली, तर कुणी कुचेष्टेनें डोळे मिचकवूं लागले. प्रत्येकजण हलक्या पावलानें जवळ येऊन यन्त्रांत डोकावून चकित होऊन किंवा विरमून, परत जागेवर बसून आपापलें सूक्ष्मदर्शक सज्ज करूं लागला.

मी दचकून जागा होऊन डोकें वर उचलून श्रमिष्टाप्रमाणें खोल घोगऱ्या आवाजांत विचारलें 'झाली कां सुटका ?'

विद्यार्थिनीच्या डोळ्यांत कारुण्यबिन्दु चमकले ! ती कातर स्वरांत म्हणाली 'तीं दोघें सुटलीं. जलदेवीनें तन्तुबाहूस अखेर मारलें खरें. पण मुळाशीं कळीप्रमाणें उत्पन्न झालेल्या बाल-तन्तुबाहूच्या शराङ्गुलीनें मात्र ती मेली'.

... दोघांच्या मृतदेहाशेजारींच प्रेमीयुग्माचें पुनर्मीलन होत होतें ! जलदेवीचा आत्मत्याग त्यांच्या स्वप्नींही नव्हता. गतभावी सङ्कटांचा विसर पडून ,दिक्कालातीत प्रेमांत ते जीव–वाईट चाङ्गलें–सर्व एकजात विसरले होते. ग्रहणाचा लोप करून, स्वजीवनाचा अन्त करून, द्वन्द्वाचें अद्वैत करून, व वैतालापर्यन्त जीवनपरम्परा पोंचविण्यास ते उद्युक्त झाले होते.
ठरत नव्हतांच्या सम्भाळ, आणि कसा करूं ?... मला वीट आला. सन्ताप
मोहक दिसली. अप्सरेच्या बेपर्वाई मनांत थैमान घालूं लागलीं. स्वतःच्या
झाली. राजे-सामन्त यांच्या समूहांतबगारांची चीड आली. स्वार्थी अन्धळें
लवकरच ते आत्मत्याग ... वातावरणांत जखडलेले मानव–अन्तरिक्षात्म्याची
तळमळ. ... जीवांचा संहार, प्रलय–खिन्न विराट पुरुष ! संहारी रूद्र ... विश्वकर्मा विराट पुरुष ...!

रौद्रनिष्ठुरपणानें काचेवरील थेम्ब झटकून टाकला–जीवनपरम्परा अनन्तापर्यन्त पोंचविण्याची महत्त्वाकाङ्क्षा लुप्त झाली. जग बुडालें–प्रलय–प्रेम निमालें, आत्मत्याग फुकट गेला ... ताऱ्यांचा प्रलय...जीवांचा संहार... आमचीं दुःखें ... अति विराट विश्वघटनेंत यांचीही गरज असेल–विराटपुरुष ... बिन्दुविश्व–विश्वबिन्दु !!

मी निर्विकार स्वरानें अज्ञापिलें 'शिष्यांनो ! दुसरे थेम्ब घेऊन त्यांतील जीवांच्या सुखदुःखांचें, जीवन-कलहांचें शरीरधर्मांचें सूक्ष्म अवलोकन करा ! काळजी नको ! अनेक विश्वबिन्दूंचा अपरम्पार अगाध सागर जवळ आहे !

असङ्ख्य जगें निर्माण झालीं...अगणित जीवांची सुखदुःखपूर्ण मालिका सुरू झाली. क्षणार्धांत जगें लुप्त झालीं.. प्रार्थनांचा आक्रोशध्वनी ब्रह्मकटाहद्वाराशींच थबकला . चिकित्सक नेत्रांची जिज्ञासा तृप्त झाली, करुणेचे सागर तुडुम्ब भरले, गतस्मृति जागृत झाल्या !

अन्तरिक्षात्मा कर्तव्योन्मुख झाला... होरपळलेल्या जीवास साक्षात्काराची शान्ति लाधली.

पण अन्तर्बाह्य उपाधीपासून अलिप्त विश्वकर्मा-संहारी विराटपुरुष निर्विकल्प समाधींत ध्यानमग्नच राहिला.

पुणें, १४ ऑगस्ट १९२७. श्रीधर बाळकृष्ण रानडे

| | | | |
|---|---|---|---|
| चिद्द्रव्य | ...Aether | सूतकृमि | ...Nematode |
| घण्टासुख | ...Vorticella | तन्तुबाहु | ...Hydra |
| चक्रशैवाल | ...Spirogyra | दोलाशैवाल | ...Oscillat |
| चक्रमुख | ...Rotifer | | |

[ एक मध्ययुगीन द... ]

फारच जुनी गोष्ट! कोणी म्हणतात दीड सहस्र तर कोणी म्हणता दोन सहस्रांवर वर्षें झालीं! इन्द्रसभेंत एक नवीनच अप्सरा आली होती तिचा जन्म एका ऋषीच्या मुखांतून झाला होता म्हणतात. एवढें खरें, कं. ऊर्वशीलाही तिचा मत्सर वाटूं लागला होता; व सर्व देवदयितांपेक्षां ती देवेन्द्राला अधिक प्रिय झाली होती. ती मात्र दिनानुदिन अमृत, देव, कल्पतरु व विमानें–सदानकदा तेंच तेंच याला कण्टाळली होती. अर्थात् बुद्ध्या म्हणा, सहज म्हणा, नुकत्याच स्वर्गांत आलेल्या यतीचा रसभङ्ग करण्याचा प्रमाद तिच्या हातून घडला व स्वर्गाच्या शासनाप्रमाणें इन्द्रालाही तिला शिक्षा देणें भाग पडलें. नुकत्याच झालेल्या युद्धांत साह्य करणाऱ्या राजाचें नांव घेऊन, एक सन्तान होईपर्यन्तच त्याची पत्नी होण्याची शिक्षा देवेन्द्रानें दिली. पण अप्सरेनें–प्रतिभेनें–हात जोडून वैदिक वृत्तांत प्रार्थना केली, "देवेन्द्र, माझ्या पतीची निवड करण्यास आपण अनुमति द्याल तर भूतलावर विलापिका उत्पन्न करणाऱ्या

ऊर्वशीप्रमाणें न वागतां पति मरेपर्यन्तसुद्धां त्याची पत्नी होण्यास माझी सम्मति आहे.” देवेन्द्राला आश्चर्य वाटलें, व रम्भादि देवाङ्गना कुचेष्टेनें हंसल्या. शेवटीं स्वर्गसुखाची खरी गोडी न ओळखणाऱ्या त्या दासीवृत्ति अप्सरेला तिच्या मनाप्रमाणें शिक्षा देऊन देवेन्द्रानें तत्क्षणीं सभा विसर्जन केली.

आज उज्जयिनी नगरींत फारच धान्दल होती. स्वर्गांतील एक अत्यन्त मोहक अप्सरा या लोकांत सुखानें संसार करण्यासाठीं स्वयंवर करणार म्हणून विक्रममहाराजांनीं प्रचण्ड रङ्ग सिद्ध केला होता. वराहमिहिरादि राजसभेचीं भूषणें, इतर पण्डित, सामन्तचक्र, माण्डलिक नृप व स्वतः महाराजही पाणिग्रहणाच्या इच्छेनें विद्यमान होते. थोड्याच वेळांत प्रचण्ड जयघोष झाला, व वैतालिक गात आहेत तोंच अप्सरेनें रङ्गप्रवेश केला. कुणाचीही दृष्टि ठरत नव्हती तिच्यावर! ती कुणाला कशी, कुणाला कशी, पण सगळ्यांना मोहक दिसली. अप्सरेची दृष्टि वावरूं लागली व सर्वत्र निःशब्द शान्तता झाली. राजे-सामन्त यांच्या समूहांतील ५०। दोघांकडेच तिनें पाहिलें; पण लवकरच ते विवर्ण झाले. पण्डित-विद्वान् यांच्यावर तिची दृष्टि बरीच ठरली. सखीनें प्रत्येकाचें वर्णन करावें, शेवटीं हिनें विषाद दाखवून तोण्ड फिरवावें. अखेरीस सर्व मण्डल फिरून अप्सरा तशीच परतली. तिला तिथें रडतां आलें असतें तर रडलीसुद्धां असती. प्रेक्षकगणांनीं एकच हुल्लड केल्यावरून तिनें चिडून तिकडे पाहिलें तों इतरांबरोबर ओरडा करणाऱ्या एका तरुणाकडे तिची दृष्टि गेली. ‘हला, त्याचें वर्णन कर’ देवाङ्गना कांहीं वेळ पाहून म्हणाली. तिचा हार पुन्हा टवटवला. सखीनें नाक मुरडलें व आम्बट तोण्ड करून ती वर्णन करूं लागली: ‘हा एका पण्डिताचा उनाड मुलगा आहे. देशोदेशीं रानींवनीं भटकणें, वाटेल त्या समाजांत हिण्डणें, मृगयादि निषिद्ध गोष्टी करणें यांतच याचा सारा वेळ जातो. याला विद्येची आवड नाहीं. पण्डितांची टवाळी करण्यांत याचा हातखण्डा आहे. शिवाय यानें रङ्गांत पाऊलही न घातल्यानें तुझीही त्याला योग्यता दिसत नाहीं—” सखीनें वर पाहिलें, तों देवाङ्गना व तो तरुण एकमेकांकडे अनिमिष नेत्रांनीं पहात होतीं. त्याची मुखश्री निवळली असून सुन्दर गम्भीर दिसत होती. वर्णन थाम्बतांच देवाङ्गना भानावर आली आणि तिनें झटकन् त्या तरुणाच्या गळ्यांत माळ

अन्तरिक्षात्मा कर्तव्योन्मुख झाला... होरपळलेल्या जीवास साक्षात्काराची शान्ति लाधली.

पण अन्तर्बाह्य उपाधीपासून अलिप्त विश्वकर्मा-संहारी विराटपुरुष निर्विकल्प समाधींत ध्यानमग्नच राहिला.

श्रीधर बाळकृष्ण रानडे

पुणें, १४ ऑगस्ट १९२७.

| | |
|---|---|
| चिद्द्रव्य ...Aether | सूतकृमि ...Nematode |
| घण्टामुख ...Vorticella | तन्तुबाहु ...Hydra |
| चक्रशैवाल ...Spirogyra | दोलाशैवाल ...Oscillat |
| चक्रसुख ...Rotifer | |

मात्र

–आपलें

नात, तेव्हां

कालिदासाला मात्र घटा-

वाद, माया-ब्रह्माचे घोटाळ, श्रुतिवाक्याची ओढाताण, व्याकरण, अलङ्कार यांचें काथ्याकूट याचाच नाद लागला. प्रतिभा प्रथम प्रथम या गोष्टीला सम्मतीच काय पण उत्तेजनही देत असे. पण त्याचे हे चाळे पुढें पुढें आवडेनासे झाले. तिनें आपल्या राजस रूपाची मोहनी त्याच्यावर पसरण्यास आरम्भ केला; मोहनी अशी, शब्दांना तो सुकुमार फुलाप्रमाणें वागवूं लागला. त्याच्या घटापटांतही मार्दव आलें. शब्दाचे नाद त्याला देवाङ्गनेच्या नूपुराप्रमाणें प्रिय वाटूं लागले. त्यांच्यामधील अर्थ तिच्या अन्तःकरणाइतके ललित भासूं लागले आणि देवाङ्गनेची बान्धेसूद ठेवण त्याच्या काव्यप्रबन्धांत उमटूं लागली !

उलट इकडे यांचें वर्तन मात्र पण्डितसम्प्रदायास विसङ्गतच होतें, व त्यांत देवाङ्गनेचें त्याला साहाय्यच होतें असें दिसे. कुठें गाण्याचा रङ्ग असो, वाराङ्गनेचें नृत्य असो, विट, चेट, वैदेशिक, कौशिक, नट, मल्ल यांच्या बैठकी असोत, तिथें कालिदास असावयाचाच. कुठेंही जाण्यास तो कचरत नसे. कोणी विचारलें तर "मला देवाङ्गना नेते," "मी देवाङ्गनेला हुडकण्याकरितां तेथें गेलों," अशीं उत्तरें तो खुशाल ठोकून देई ! यावरून कुणीं पण्डितांनीं कालिदासाविषयीं तर कुणीं देवाङ्गनेच्या (!) कुलशीला-

ऊर्वशीप्रमाणें न वागतां पति मरेपर्यन्तसुद्धां त्याची पत्नी होण्यास माझी सम्मति आहे." देवेन्द्राला आश्चर्य वाटलें, व रम्भादि देवाङ्गना कुचेष्टेनें हंसल्या. शेवटीं स्वर्गसुखाची खरी गोडी न ओळखणाऱ्या त्या दासीवृत्ति अप्सरेला तिच्या मनाप्रमाणें शिक्षा देऊन देवेन्द्रानें तत्क्षणीं सभा विसर्जन केली.

आज उज्जयिनी नगरींत फारच धान्दल होती. स्वर्गांतील एक अत्यन्त मोहक अप्सरा या लोकांत सुखानें संसार करण्यासाठीं स्वयंवर करणार म्हणून विक्रममहाराजांनीं प्रचण्ड रङ्ग सिद्ध केला होता. वराहमिहिरादि राजसभेचीं भूषणें, इतर पण्डित, सामन्तचक्र, माण्डलिक नृप व स्वतः महाराजही पाणि-लाभाच्या इच्छेनें विद्यमान होते. थोड्याच वेळांत प्रचण्ड जयघोष झाला, आपली [illegible]क गात आहेत तोंच अप्सरेनें रङ्गप्रवेश केला. कुणाचीही दृष्टि प्रभाव आहे. [illegible]तिच्यावर! ती कुणाला कशी, कुणाला कशी, पण सगळ्यांना विद्युत्ताच पटली असलें [illegible] दृष्टि वावरूं लागली. व सर्वत्र निःशब्द शान्तता

प्रतिभेला या गोष्टीची फार भीति [illegible] तारुण्याचा [illegible] व पतीनें विमनस्क व्हावें यासारखी स्त्रियांना दुसरी आपत्ति नाहीं. पूर्वीप्रमाणें पतीस रमवावें म्हटलें तर फुलांचे, भ्रमरांचे, [illegible] क्रीडाविलास पाहणें, ढगाकडे पाहून लहान मुलासारखें त्याला हत्तीचे, उण्टाचे आकार देणें हें कुतूहल; आणि उगीच गान्धार ते केरळरामेश्वरापर्यन्त, सिन्धूपासून भागीरथी-पर्यन्त रानें-वनें, पर्वत-नद्या पायाखालीं घालणें, नगरें धुण्डणें हा जोम आतां त्यांच्यांत राहिला नव्हता. तारुण्यांतली धुन्दी व धडाडी दोन्ही आतां हळु-हळू स्मृतिशेषच होत होत्या. जेव्हां कुठें प्रत्यक्ष स्वर्गाचा प्रवास, रम्भा-ऊर्वशीचें दर्शन, नन्दनवनवास, देवेन्द्र, वागीश, प्रजापति यांसारख्यांच्या भेटी इत्यादिकांच्या गोष्टी सांगाव्या आणि त्यांच्या नांवांची भीड घालावी तेव्हां कोठें राजश्रींना स्फूर्ति व्हावयाची. पण एकदां मेलेलें हृदय हललें म्हणजे मात्र पूर्वीचें चापल्य व जोम यांचा नूतन स्वर्गीयतेशीं सुन्दर मिलाफ होई. मग देवाङ्गना वरून कितीही त्रासलेली असली तरी अन्तर्यामीं आनन्दलेली असे. ती मैत्रिणीस म्हणे; "हेंच खरें, तारुण्यांत पुरुषांना बाह्य सौन्दर्य आवडतें पण त्यांत प्रतिष्ठा नाहीं. आम्हांला तरी त्या वेळीं नटण्या-मुरडण्यावांचून काय सुचतें म्हणा ? पण आतां माझ्या स्वर्गीय सम्बन्धामुळें

आर्यपुत्रांना माझी खरी कल्पना आली तर मी आपलें स्वतःचें 'दिष्ट्या वर्धसे भर्तुबहुमता' असें अभिनन्दनच करीन. मला या त्रासाचें कांहींच वाटत नाहीं."

पतीच्या प्रसन्नतेकरितां प्रतिभा पुष्कळ गोष्टींत त्यांचे हट्ट पुरवूं लागली. राजा म्हणजे विक्रमादित्यासारखाच पाहिजे. तो शूर, कर्तृत्ववान् व सामान्य धर्माचार जाणणारा तर असावाच, पण बहुपत्नीकत्व, रङ्गेलपणा हे गुण राजाजवळ नसावयाचे तर कुणाजवळ असावयाचे, असा त्याचा निश्चित सिद्धान्त- इतर विभूति वन्द्य पण अनुकरणीय नव्हत! म्हणून निरुपायानें देवाङ्गना त्याला पुरूरवा-दुष्यन्ताच्याच गोष्टी साङ्गे, पण कथानकांत अशी चातुरी करी कीं, त्यांच्या दुर्गुणांचा वास आपण होऊन घेतला तरच यावा. इकडे रङ्गेल राजाची इतकी सुधारलेली सोज्ज्वळ आवृत्ति निघालेली पाहून विक्रमराजाही प्रसन्न असे. 'शकुन्तले'मध्यें तर देवाङ्गनेला पूर्वींचें वैभव पुन्हा दिसलें. पण म्हातारपणामुळें, विनयानें कीं घटापटानें कुणास ठाऊक, कालिदास आपल्या लिखाणाकडे अलीकडे रूक्ष मनानें पाहूं लागला होता. एकदां रागावतांना 'कण्वाला संसारी माणसासारखें रडविण्यांत त्या स्थितप्रज्ञ महामुनीचें अपमानास्पद दृश्य प्रतिभेनें काढविल्याचा प्रवाद राजेश्रींच्या मुखांतून बाहेर पडला! एकदां देवाङ्गना डोळे मिटून म्हणाली 'आर्यपुत्रांची महती माझा मल्लीनाथच पुढें जगाला पटवून देईल'. तेव्हां कालिदास हंसला आणि 'हा कोण मल्लीनाथ? तूं वेडी आहेस. तुला केवळ आपलेपणानें या ग्रन्थांची महती वाटते' असें म्हणाला.

शेवटीं म्हातारपणीं तर बुवांची वृत्ति अगदींच चळली. एकदां प्रसङ्गानें ते प्रतिभेला गम्भीरपणानें म्हणतात, "माझ्या सबन्ध काव्यग्रन्थांत माझ्या नाटकांच्या नान्द्या व भरतवाक्यें एवढेच विद्वत्तेचे विलास माझ्या मागें टिकण्याजोगे आहेत. अवान्तर सगळे वेडाचे चाळे आहेत. तुझ्या भरीं पडून मी माझ्या शहाणपणाचे चाङ्गलेच पुरावे जगाच्या हातांत दिले आहेत. हा तुझ्या स्वर्गाच्या भ्रामक मृगजळाचा प्रताप!"

आतां मात्र देवाङ्गनेला राग आला. ती म्हणाली, "मृगजळ! भ्रामक स्वर्गीय कल्पना व ध्येयाभास असें बोलायचें असेल तर मी आजच इकडे

स्वर्गाला नेऊन प्रत्यक्ष खात्री करून देतें!" वार्धक्यानें थरथरणारी मान अधिक जोरानें हलवून नकार दर्शवीत 'आर्यपुत्र' म्हणाले, "तुझ्या स्वर्गातलें तें ठरीव ठशाचें सुख मला नको आहे. हवें तें मिळाल्यावर मग वीट आणि विरसच कीं नाहीं? आणि पुढें तरी 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति'च कीं नाहीं? माझी तर कथा दूरच पण माझें नांवसुद्धां स्वर्गांत येणार नाहीं." बोलले बोलले. अनन्वित बोलले, व तसल्या उतारवयांत देवाङ्गनेला न विचारतां रागावून लङ्केच्या राजाकडे गेले. प्रवासाच्या श्रमानें फणफणून ताप आला व तिकडेच कुठल्याशा घरीं 'आर्यपुत्र' वारले.

देवाङ्गनेचें काळीज फाटून गेलें, अप्सरा असूनही ती रडली. तिला वेडच लागलें म्हणाना! तिनें निश्चय केला, 'त्यांच्याप्रमाणें मीही हट्टच धरीन. पूर्वसुखस्मृतीला आधार म्हणून त्यांचें नांव तरी स्वर्गांत नेईन. नाहीं तर त्या असार स्वर्गालाच जाणार नाहीं'. तिनें देवेन्द्राची तशी अभ्यर्थना केली. पतीसाठीं रडणाऱ्या अप्सरेची स्वर्गांत प्रतिष्ठा व आवश्यकता नाहीं अशा गर्विष्ठ विचारानें त्यानें तिची विनन्ती मान्य केली नाहीं. त्याला वाटलें येईल एकदोन दिवसांत प्रतिभा कण्टाळून! मर्त्य लोकांत तें असें किती दिवस अमर राहील? स्वर्गीय देवतेला घरची ओढ लागल्याशिवाय कशी राहील? पण बापडे देवेन्द्रवागीश पुरे पस्तावले असतील! अद्याप इहलोकाच्या चिरकाल वसतीस कालिदासाचें नांव कण्टाळत नाहीं, स्वर्गवासास योग्य होत नाहीं, व देवेन्द्र तर अजून वर प्रतिभेची वाट पहातोच आहे!!

दत्तात्रेय लक्ष्मण गोखले

# श्रीशारदावन्दन

[ वृत्त—मन्दारमाला ]

छाया तरूंच्या किती रङ्गलेल्या तुझ्याभोंवतीं थाटुनी राहतीं
स्वर्गांतुनी पाझरे तेज खालीं, फुलें, पर्णराजी, तृणें नाहतीं;
तीरीं शिळेच्यावरी भव्य मूर्ती तुझी शुभ्रवस्त्राङ्किता हासते,
वीणा मृदु स्पर्शनें छेडुनी ही, तरङ्गावली अङ्गुली निर्मिते.

देवी ! तुझ्या दिव्य आलोकनाची शरच्चन्द्रिका त्यावरी नाचते;
चैतन्य सञ्चारुनी अन्तरङ्गीं जडांना तुझी दिव्यता लाभते;
नाचे तुझ्या गोड झङ्कारगानावरी ताल देऊन मन्दाकिनी;
नाचे तरङ्गांतुनी गुङ्गलेली मुदें खालती मन्द कल्लोलिनी.

वायू तुझ्या मञ्जु गुञ्जारवानें इथें मोहुनी सारखा थाम्बतो,
कादम्बिनीखण्ड हा अन्तराळीं तुझ्या प्रेरणेनेंच आन्दोलतो.
ध्यानस्थ झालें तुझ्या आदिरूपामधें विश्व हें गायनीं डोलुनी;
संसार–दुक्खामधें पोळलेले इथें बैसती अन्तरें खोलुनी !

ओवी–अभङ्गाञ्जलि-श्लोक-आर्या-मुखांनीं तुला आळवीलें कुणी;
माते ! कृपावृष्टि केलीस त्यांच्या मनोभूत आर्तस्वरा ऐकुनी;
मी दीन, मी लीन; तेथें कशाला बरें अल्पधीनें उभे राहणें ?
ध्यावें तुझें ध्यान येथून, आई ! इथूनी तुला भक्तिनें वन्दणें

जीवा हवें तें कुठें सांपडेना, म्हणोनी तुझ्या लागलों चिन्तनीं;
माते ! मनःशान्ततेची सुधा या जिवा पाजवी गीत-गङ्गेंतुनी;
निःस्वार्थतेनें तुझे शब्दबिन्दू असे सांठवूनी सदा अन्तरीं
सोडीन एके दिनीं काञ्चनाची शिरांतून गङ्गा गिरीशापरी

पुणें, १४ फेब्रुवारी १९२५ गिरीश

## लिहूं कुणावर कविता !

[ जाति—फुलवेल ]

फूलपांखरा ! थाम्ब जरासें
लिहुं दे तुजवर गाणें मधुसें
रङ्ग देइं तव मला रम्यसे
गात तव चरित । फिरुं दे मज सर्वहि जगत.

अरे ! उडसि कां ?—थाम्ब, पकडतें !
गेलें !! येइ न कां परि हातें ?
कोण सुखावि तुज मृदु सङ्गीतें
म्हणुनी जाशी । बहु वेगें अन्यचि देशीं !

लिहूं कुणावर कविता तरि मी
सुन्दर सुरेन्द्रचाप–व्योमीं
लिहुं त्यावर का कविता नामी
हेंहि पण गेलें ! काय हें विधिनें केलें !

ॐ ॐ ॐ

नक्षत्रांची मृदु नव माला
रजनि शोभविल शशिकण्ठाला
बुलबुल फेंकिल नाभिं तानेला
मी समयीं त्या । अर्पीन तिला नव कविता.

तरल काव्यमय तेजोमूर्ती
काळोखाहुनि भिन्न आकृती
रजनीराशी चित्रित चित्तीं
स्वप्नमय चिता । अर्पीन मनोहर कविता !

तारा-पणत्या नभिं पाजळल्या
क्षितिजें धरिलें चन्द्रज्योतिला
केतुबाण नभिं सूंसूं गेला
उल्कासुमनें । उधळिलीं कुणी मोदानें ?
विलसे शशि, उडुमाला गगनीं
बुडलें जग मङ्गलमय गानीं
कां नच येई रजनी अजुनी
स्वप्नराशीला । अति उत्सुक मी बघण्याला

ॐ ॐ ॐ

वाट पाहतां दमलें ! कळलें-
'खपुष्प धरण्या धांवत सुटलें'
भ्रांतिकाव्यपट-तन्तू विरले
विषय कवितेला । कोणी तरि द्या हो मजला !
रसिक म्हणे मज 'विषय कशाचा ?
पाठ बोल तूं निजप्रेमाचा
विचार कर तूं आयुष्याचा
गुम्फ त्या कविता । डोलव मग सगळ्या जगता'

मनोरमा रानडे

पुणें, १९१४

## वृद्ध कवि

[जाति—मुद्रिका]

कां उठतां ? खालीं बसा तरुण मण्डळी,
उपचार ठेवितां कां हा ? समताच योग्य या स्थळीं
लोचनांत आदर दिसे न हा थोडका
स्तुतिहून नसे स्नेहाची ही शान्त नजर गोड का ?

म्हणण्याचा आग्रह नको. अहो, वृद्ध मी,
नव कवनें ऐकायाची जरि हौस न झाली कमी

हृदयांत अतां झोंपली स्फूर्तिनन्दिनी
जाहला पराक्रम मागें जरि थोर आमुच्या दिनीं

बदलली सृष्टि, सम्पले दिवस आमुचे
ही समुद्धारिणी क्रान्ती चालली प्रभूला रुचे

मी झालों पिकलें पान, आणखी तुम्ही
टवटवीत सुमनें नामी काव्याच्या कल्पद्रुमीं

वा क्षितिजीं तारे तुम्ही नवोदित पहा
चालला लयाला माझा क्षीणांशु काव्यदीप हा

वा भाट उषेचे तुम्ही, दिव्य पांखरें,
गा क्रान्तींचीं नव गाणीं, सौन्दर्य दाखवा खरें

मज तुमचें आशागीत आज ऐकुं द्या,
नसणार कदाचित् येथें मी उषा पहाया उद्यां

राहोत पुराणें जुनीं देवळांत तीं
स्थळ रुचे मला जिथ गाते नववेद कवींची तती

ही जडता जडु पाहते, न ही परिणती
वर्धिष्णु बाल्य मज लाभे पुनरपी तुम्हांसङ्गतीं

शारदा दिव्य माउली थोर आपुली
अन् बाळें आपण सारीं सानुलीं तिचीं सानुलीं

नाचलों खेळलों पुरा, अतां भागलों
मी माण्डीवर आईच्या हा पहुडाया चाललों

परि नीज यावया गीत मधुर गा तुम्ही
अन् मिटल्या डोळ्यांतूनी गाळीन दोन अश्रु मी

माधव ज्यूलियन्

# कवि-कातळ

[ गज्जल वृत्त—माधव ]

वाटे मनांत सन्निध यावें तुझ्या जरी
कां दाटते अकारण हुर्हूर अन्तरीं !
येऊन बैसतां मन व्याकूळ जाहलें
दृश्यें कितीक मागिल येती पुढें घरीं !
विद्यालयीन यौवन-कालांत येउनी
मी ध्येयमाधुरी इथ सेवीं निजान्तरीं
भावी नव्या मनोरम सत्कल्पनेसवें
काव्यात्म बैसलों कधिं गुङ्गून अम्बरीं
केव्हां उदासुनी मन अन्धार दाटला
पोटीं प्रसन्नता परि तूं घातली खरी
दृश्यस्वरूप, उज्ज्वल ध्येयें सभोंवतीं
पाहून धीर मानस माझें पुन्हा धरी
संसार-गीत गुम्फित केव्हां सखीसवें
मी थाम्बलों उषा नव पाहात अम्बरीं
आलों जमून वाङ्मयबन्धु-स्वसा कधीं
केले विहार, वा दिन वेंचून शर्वरी
आलापुनी कधीं मधु सङ्गीत काव्य वा
वाऱ्यावरी तरङ्गविली गीत-बांसरी
साधावयास उन्नति, गप्पा, विनोद वा
गूजें गभीर सौख्यद केलीं परोपरी
शोभा सुरम्य आरुण, सौन्दर्य डोङ्गरीं
भोंतालिंचें, करी मन वेड्यापिशापरी

केव्हां झुळूक शीतळ सेवून माधवी
सन्ध्या सतेज सुन्दर मी पाहिं लाजरी
केव्हां भिजून, हिर्वळ न्याहाळिली नवी
सोडून कल्पना नव मी कल्पनेवरी
केव्हां धुक्यांत बैसुन वा चान्दण्यामध्यें
घालों मनात, शारद सेवूनि माधुरी
काव्यात्मता खरोखर लाभे तुझ्यामुळें
स्फूर्तीस गावया तव सौन्दर्य हो झरी
चित्त स्थिरावुनी मग मी गूढ चिन्तनीं
गेलों गढून लोचन लावूनिया वरी
शान्ती कितीकदां मज तेव्हां तुवां दिली
आतांच दाटती मग कां अश्रुच्या सरी ?
जीवा गतस्मृतीमधिं माधुर्य वाटतें
येतों म्हणून सन्निध तूझ्या खरोखरी !

पुणें, ६ ऑगस्ट १९२७ गिरीश

## घाटांतील खुणा

[सुनीत]

लोण्ढा खालुन ये वरी भरुन तों गेली धुक्यानें दरी
जाई नागफणी दडून पण हा लागे दिसाया तळ
घेती झेंप घळींतुनी खळखळां फेंसाळ हे ओहळ
झाडी घे बुरखा, परन्तु गवती नाचे हरित्सुन्दरी
पानाआड खुले कचोरकलगी, रानीं चवेणी फुटे,
लाखों सूर्यफुलें इथें चिमुकलीं, हे किर्मिजी तेरडे
सोनेरी गिरिदावणीवर कसें हें ऊन नामी पडे !
ओलें रान बघून शान्तिलहरी स्वान्तीं मजेची उठे

तों येई हिरिरी नवीन करुनी लाटेप्रमाणें धुकें
ऐशा दोन धुक्यांत अन्तर पडें तें आमुचें जीवित
होई अन्धुक 'काल' विस्मृतिमधें, नाहीं 'उद्या' माहित;
देई चञ्चल 'आज' पुण्यसुख हें-होईल का हें फुकें ?
आला योग कसा अकल्पित ! असा येवो न येवो पुन्हा;
सौख्याची स्मृति ठेवितीलच परी घाटांतल्या या खुणा

माधव ज्यूलिअन

## सुमनावलि

[ सुनीत-वृत्त—गीतिका ]

मधुरस्मिता मृदुशीतला विधुची प्रभा बघ फांकली
सुखशान्तिदायक शुभ्रता उधळोनिया क्षितिमण्डलीं !
मृदु वायुच्या झुळकीसवें तरुवल्लरी हलु डोलती
हिमशुभ्र पाहुनि चन्द्रिका गुजगोष्टि तीं करु लागली !
कुसुमें सुवासिक नाचुनी जनमानसासहि वेधितीं
सुमवाटिका रसिकांप्रती रिझवीत तत्पर राहिलीं !
अतिमन्द वीचि जलाशयीं पवनासवें मृदु कांपती
कमलावरी अलिगुन्जनस्वनता प्रदोषिंच लोपली !
पसरे अलौकिक स्तब्धता जणुं मानवी अवनी लपे
प्रकृती परात्पर देवता अधिकार चालवुं लागली !
समयीं अशा मज वाटतें, भटकूं सुदूर कुठें तरी
भय कोठचें-शशिमित्रता, प्रियकान्तनामजपावली !
हृदयोत्कटा प्रणयोज्वला स्मृति मानसीं उजळू पुन्हां
विरहानला शमवावया करुं अश्रुंची सुमनावली !!!

इस्लामपूर, १ सप्टेंबर १९२५ मनोरमा रानडे

# नौकाविहार

[ जाति—शूर्पणखा ]

सखे ग ! प्रशान्त किति यामिनी !
ही तशीच जलवाहिनी ॥ ध्रु० ॥
ही विशाळता किति तरी
तव उदार हृदयापरी
करुं विहार चल तीवरी ॥ सखे ग० ॥
किति अथाङ्ग जळ हें दिसें
तव अगाध अनुरागसें
मज जडे जयाचें पिसें ॥ सखे ग० ॥
तव मुखीं छटा नाचती
जळिं लहरि तशा धांवती
तव मृदुता अनुकारिती ॥ सखे ग० ॥
गगनिंच्या सुधासिञ्चनीं
उमलली पहा मेदिनी
कुमुदिनी जणूं उपवनीं ॥ सखे ग० ॥
बघ नभांतल्या चान्दण्या
उतरल्या जळीं डुम्बण्या
गतसुखस्मृती जणुं मनीं ॥ सखे ग० ॥
चवथिच्या विधूसारखी
चिमुकली दिसे नाव, कीं
फिरुं बसून या पुष्पकीं ॥ सखे ग० ॥
चमकत्या तरङ्गासवें
ही डुलेल नौका जवें
जशि रसिकजनीं कञ्चनी ॥ सखे ग० ॥

जळ झुलेल जैं वायुनें
सुख मिळेल आन्दोलनें
जें दिलें अङ्कि आइनें ॥ सखे ग० ॥
तरुलता उभ्या दों तटीं
लवलवून डोकावती
अनुभवूं सुखें आज तीं ॥ सखे ग० ॥
विहरतो विधू उडुगणीं
सुख इथून मिळवूं झणीं
नभबिम्बित जळिं हिण्डुनी ॥ सखे ग० ॥
भववनांत तूं अप्सरा
प्रगटलीस या पामरा
सुरपदास न्याया झणीं ॥ सखे ग० ॥
तव कोकिळकण्ठांतुनी
ऐकवी मला गौळणी
नच दुजा स्वर्ग याहुनी ॥ सखे ग० ॥

येरवडा, ३१ ऑक्टोबर १९२५ — यशवन्त

## फेराचें गाणें

[ छन्द—पादाकुलक अष्टाक्षरी ]

नागपञ्चमीच्या सणीं
उठा उठा साऱ्या जणीं
हरपली तगमग
तृप्त पहा दिसे जग
श्रावणांत ऐन वेळीं
मेघरायें कृपा केली

मेघराय काळा काळा
अमृताचा हा जिव्हाळा
वर झडे याची भेरी
याची पताका सोनेरी
हिण्डे वाऱ्यावर स्वारी
गनीमाची दौड भारी १

उठा उठा साऱ्याजणी
नागपञ्चमीच्या सणीं
स्वस्त झाली पाच रानीं,
लोटे लाल नवें पाणी
तुडुम्बल्या जळें खांचा,
घोष चाले बेडकांचा
गेली भूमि गवतून
सोनियाचें पडे ऊन्
वर वारा ये[illegible]ता जातां
ग[illegible]ताच्या देखा लाटा
पडे झिमझिम त्यांत
ऊनपावसाची गांठ २

नागपञ्चमीच्या सणीं
उठा उठा साऱ्याजणी
आज चला करूं मौज
चिन्ता मग आहे रोज
साडी चोळी नवी लेऊं
केस उदवून घेऊं
बुचड्यांत सोनचांफा
कस्तूरीचा जणूं नाफा
वारुळाला जाऊं सङ्गें
गात गात गाणीं रङ्गें
नाग पृथ्वीमाउलीला
झेली माथां अवलीळा ३

उठा उठा साऱ्याजणी
नागपञ्चमीच्या सणीं
फान्दियांना बान्धा दोर
झोका मोठा घ्या समोर
उत्सवाच्या झोल्यावर
घेऊं झोके दिनभर
तृणाङ्गणीं फुगड्यांत
पाहूं कोण टिकतात
सं[illegible]ङ्काळीं स्वस्थ बसूं
खेळीमेळीमाजीं ह[illegible]सूं
कोणी चतुर शहाणी
मग साङ्गेल कहाणी

नागपञ्चमीच्या सणीं
उठा उठा साऱ्याजणी
पञ्चमीची रुन्द कोर
हासे सोनेरी समोर
पहा तारा आकाशांत
गात फेर धरितात
चञ्चल या चान्दण्यांत
फेर धरूं गाणें गात
कुणी तरी साङ्गा बरें
आम्ही म्हणूं एकस्वरें
हेलावित लहरींत
नागपञ्चमीचें गीत ५

माधव जूलियन्

# शूर्पणखा

[ जाति—शूर्पणखा ]

गेलें तुझ्यावर जडून्। रामा, मन गेलें तुझ्यावर जडून्॥ ध्रु०॥

किति नटून् सजून् मी आल्यें
किति अलङ्कार हे ल्यालें
किति नाजूक गेलें बाइ होऊन्। रामा, मन०॥

हीं आठ दिसनें मला
प्रिय तुझ्यासाठीं घननिळा !
किति घेसी अतां जिव ओढून्। रामा, मन०॥

तुझ्या रुपानें मन मोहिलें
तुझ्या पायाशिं तन वाहिलें
चल भेटूं अतां कडकडून्। रामा, मन०॥

मी प्रभावशालिनि सती
कां सितेवर धरिशी प्रिती
जिवलगा, तिला चल् सोडून्। रामा, मन०॥

मति रामाचि विस्मित झाली
सितामाई हसूं लागली
शूर्पणखा गेली मग चिडून्। रामा, मन०॥

घावे खायास मायाविनी
लक्ष्मुमणानें तों येउनी
परतवीलि नाक-कान् कापून्। रामा, मन०॥

गिरीश

पुणें, १० नोव्हेम्बर १९२५

## न्यारीचा वकूत

[ जाति—मुद्रिकेंतील समपङ्क्तीसारखी ]

न्यारिचा वकुत होईल        मैतरणी बिगि बिगि चाल
नाङ्गूरसुटीच्या आंत        पोंचाया होव तत
सोडितिल् हात बैलांला        धुण्डील नदर कोनाला

नदरे न पडन् मी जरी
जाईल मर्जि ग तरी
उरिं रुतल माझ्या सुरी

नग नग गमाऊं येळ        मैतरणी बिगिबिगि चाल        १
लइ वाडुळ जुंपि झाल्याली        असतील सभ्दि शिणल्याली
शिण जाइल न्यारि करून        अन् साङ्ग कुणा देखुन
तें खुलें तोण्ड घामानं        भरघोंसहि कणसाहुन

पाहिलं जरी रोज मी
तरि हौस न होई कमी
फिरफिरुन पगायास मी

होतसें मनिं उताईळ        मैतरणी बिगिबिगि चाल        २

येरवडा, ७ सप्टेम्बर १९२५        यशवन्त

## भलंरी

[ जाति—कोकिळा ]

भलंरी घाला चला गड्यांनो ! भलंरिचं गा गीत
गड्यांनो ! भलंरिचं गा गीत ॥ ध्रु० ॥

पाझरला रस ह्यो चन्देरी
डोङ्गर झालं समदं रुपेरी
घुमूं लागलं आनन्दाचं शेतांतुन सङ्गीत
गड्यांनो ! शेतांतुन सङ्गीत ॥ भलंरी० ॥

पाचोळ्यांतुन सळसळणारा
झुळझुळुनी ह्यो शीतळ वारा
सच्छन्दानं गात चालला आपुल्याच लहिरींत
गड्यांनो ! आपुल्याच लहिरींतं ॥ भलंरी० ॥

सूर लावुनी येड्यावाणी
वोढा गाई अपुलीं गाणीं
सजण लागला जणूं लावणी गाया खडकाळींत
गड्यांनो ! गाया खडकाळींत ॥ भलंरी० ॥

लवुन जुन्दळा देई डोल
राजा अपुला ह्यो बिनमोल
गाउन त्येला, घाम जरासा गाळूं या मातींत
गड्यांनो ! गाळूं या मातींत ॥ भलंरी० ॥

कणखर दावुन म्हराटबाणा
गोळा करुं या मोंतीदाणा
इर्जिक खावूं आनन्दानं, बसून मंग काळींत
गड्यांनो ! बसून मंग काळींत ॥ भलंरी० ॥

गिरीश

## एक विद्यार्थिनी

[ सुनीत ]

पायीं घालुनि शू, धरी निजकरीं रॅकेट टेनीसची
ओव्हर्‌कोटहि बायकी चढविला, वेणी रुळे सैलशी
कोट्या झोडित वर्गबन्धुवरती, प्रोफेसरांच्यावर
बाला मोहक मैत्रिणीसह कुणी टाकी पदें सत्वर

जातीचा अभिमान जाणुनि पुरा अङ्गीं तिच्या बाणला
डोळे बेदरकार, घे पुरुषही तीच्यापुढें नम्रता
अङ्गीं ताठरता, पदीं चपलता, वाक्ताडनीं उद्धता
शोभे सर्व प्रमाणसुन्दर तिला, हें श्रेय बाहूबला
लीलेनें फिरवीत ब्यॅट करिंची वादांत उच्चैस्तर
होतो भास जणूं करीं धरि गदा कौमोदकी श्रीधर
किंवा ही महशूर रजपुतपरी वीरासवें झुन्जतां
आवेशांत चढे, गमे जणुं तनूयष्टीकडे पाहतां

देवा ! कां रमणींमधें ठरविली स्तुत्यई नाजूकता
स्वातन्त्र्योन्नतिला विनाबल कसें येईल त्यां साधितां ?

इसलाम्पूर, २८ ऑगस्ट १९२५ मनोरमा रानडे

## बालगन्धर्वांस

[ गज्जल वृत्त—नराच ऊर्फ पञ्चचामर ]

विलोल गोल लोचनीं खगोल तेज रङ्गलें
विशाळ भाळदर्पणीं कितीक इन्दु बिम्बले !
त्वदीय जादु लाभली कुणासही न भूतळीं
म्हणून सेवनीं तुझ्या लहान थोर लागले.
तुफान सिन्धु नाचतो, अफाट वात खेळतो,
त्वदीय गान ऐकतां क्षणार्ध सर्व थाम्बले.
कसा असेल स्वर्ग तो जगीं कुणी न जाणतो
म्हणून तेथुनी तुला असेल काय धाडिलें ?
कवीन्द्रही नसून तूं, मुनीन्द्रही नसून तूं,
स्वगीतयोगसाधनें जगास सर्व भारिलें
स्वरूप रम्य देखुनी, रमून दिव्य गायनीं,
सुटून पार्थिवांतुनी समस्त जीव गुङ्गले

येरवडा, २० मार्च १९२४ यशवन्त

# अन्धारांतील बाण

[ जाति—साकी ]

मग थाटानें विवाह त्यांचा अतुल साजरा झाला
आणि तियेच्या उरला नाहीं पारच आनन्दाला
ज्यानें त्यानें बघुन तयांना कुतुकें नावाजावें
घरांतल्यांनीं प्रेमें त्यांचे कोड नवे पुरवावे
जिकडे तिकडे आनन्दाचें उठलें नव सङ्गीत,
वाटे त्यांना 'विश्वीं आतां केवळ भरली प्रीत !'
परि एकानें वीष ओतलें जहरी त्याच्या कानीं
ढासळुनी तट गढूळ झालें एकाएकी पाणी !
त्यजुनि तियेला, माहेराला मग पोंचवितां त्यानें
हितशत्रूला उकळ्या फुटल्या केवळ आनन्दानें
कुणि सासूला, कुणी पतीला, तिला निन्दिलें कोणीं
कण्ड्या उठल्या भलभलत्या मग; हृदय विद्धलें बाणीं !
पूत मनानें आणि गुणानें जरी राहिली बाला
जननिन्देचा घाव भयङ्कर सहन न तिजला झाला
व्याकळुनी मन, धावूं लागे सहानुभूतीपाठीं
करुण-वाणिनें विनवी देवा पतिच्या पायासाठीं
वाटे तिजला 'हाय ! बोलती भलभलते जे बोल
न कळे त्यांना, कसें चुरडती ते हृदयाचें फूल !'
अशा परीनें जरा तावलें भट्टीमध्यें सोनें
आर्त सतीची हांक ऐकिली प्रेमळ परमेशानें
कुणास ठावें, कसें जाहलें ! पति येउन चरणाशीं
कृतापराधक्षमा याचुनी, धरी तिला करपाशीं

आणि गाइली सुरेल त्यांनीं संसाराची नान्दी
वृक्षासङ्गें सङ्गत झाली कायमची मग फान्दी.
दिवस लोटले ! संसाराला बहार आला पूर्ण
चढत्या विभवीं संवेदन तें, विस्मरली ती तूर्ण
त्याच सुशिक्षित नगरीं कोणी दुसरीं हृदयें दोन
ओढुं लागली परस्परांना प्रेमें आकर्षून
सुरलोकींची रतिमदनांची, लैलामज्नूनांची
बाजीमस्तानींची, निर्मल, म्हणती, प्रीति तयांची
परन्तु केली याच सतीनें जनानिन्देवर ताण
अचुक मारिला दुर्वचनांचा तीव्र विषारी बाण
वर्मीं बसुनी घाव जाहली त्यांतिल ती घायाळ
करपवुनी तिज टाकी, निष्ठुर पेटाविलेला जाळ !
बोले मग तो 'हाय ! बोलती भलभलते जे बोल
न कळे त्यांना, कसें चुरडती ते हृदयाचें फूल !'

पुणें, ९ एप्रिल १९२६ गिरीश

## कृतज्ञता

[ जाति—दिण्डी ]

पोर खाटेवर मृत्युच्याच दारां
  कुणा गरिबाचा तळमळे बिचारा;
दूर आई राहिली कोंकणांत,
  सेविकेचा आधार एक हात !
ताप त्यानें भरतांच तडफडावें;
  पांखरानें एकलें फडफडावें !
हळू गोन्जारी सेविका दयाळू
  डाक्तराचें वच शान्तवी कृपाळू

कधीं त्यानें घ्यावें न मुळीं अन्न,
कुठें डोळे लावून बसे खिन्न
आणि डाक्तर येतांच गोन्जराया
हाय! लागे तो घळघळां रडाया!

एक दिन तो व्याकूळ फार झाला
आणि त्यानें पुशिलेंच डाक्तराला—
"अतां दादा, मरणार काय मी हो?"
तोंच लागे अश्रुची धार वाहों!

हृदय हलुनी डोळ्यांत उभें पाणी,
तरी डाक्तरची वदे करुण वाणी

दोन गोष्टी साङ्गून धीर देई
पुन्हा गोन्जारुन शान्तवून जाई.

रात्र अन्धारी माजली भयाण
सोसवेना जीवास अतां ताण

हळुच बोलावी बाळ डाक्तराला
तोहि धर्मात्मा धांवुनीच आला

अतां बाळाला टोंचणार, तोंच,
वदे वासुन पांखरूं दीन चोंच—

"नको आतां! उपकार फार झाले!
तुम्ही मजला किति...गोड...वागवीलें!

भीत...दादा...मरणास...मुळीं...ना...हीं!
तु...म्ही...आ...ई!!" बोलला पुढें नाहीं!

झणीं डोळे फिरविले बाळकानें
आणि पुशिलीं लोचनें डाक्तरानें!

पुणें, २५ सप्टेम्बर १९२५

गिरीश

# सङ्गमोत्सुक डोह

[ छन्द—प्राची अक्षरसङ्ख्याक ]

एकत्र गुम्फून जीवितधागे
प्रीतीचें नर्तन नाचलों मागें
  एकटा उभा मी येथें
  भोंवतीं शोधीं प्रियेतें
न दिसे कोठें; का सोडून गेली ?
लोपते का कधीं प्रीति उदेली ? १

दृष्टीस पडे हें भयाण मात्र
रेताड कोरडें उथळ पात्र !
  जर न सखी सङ्गतीं
  तर मी कुण्ठितगति
प्रीति या हृदयीं अथाङ्ग खोल
तुडुम्ब भरली, परन्तु फोल २

हीणविती कोणी, 'भावना मेली
हांसेना बोलेना करीना केलि'
  खस्याळ तुफानी वारा
  दौडत येतां भरारा
उठती चञ्चल बाह्य तरङ्ग
अन्तरीं जडता न पावे भङ्ग ३

जीवनज्योत न माझिया गेहीं
म्हणून असित वसन देहीं
  एकली कौमुदी हासे
  ढगांत खिन्नच भासे,
स्तिमित नजर लाविती तारा
मावळे उत्साह नाचाचा सारा ४

खाऊन रवीचा प्रखर ताप
कष्टून, लागून जीवांस धाप
  प्रदोषसमयीं येती
  क्षणैक आराम घेती
घरास वळतीं माणसें गुरें
मदीय अन्तर निःशब्द झुरे. ५

अम्बरीं इन्द्राची दुन्दुभि वाजे
भीषण सुवर्णसुन्दरी साजे
  मेघांत हासत खेळे
  लवत नाचे ते वेळे
देवांचा भरून येऊन ऊर
सहस्रनयनीं ओसण्डे पूर ६

नाचेल मयूर अवनीतलीं
मण्डूक ते द्विज गातील जलीं
  होऊन मत्त त्या क्षणीं
  धावून प्रिय साजणी
देशील ना मज कसून खेंव ?
बान्धितील वर तोरण देव ७

म्हणत मङ्गल जङ्गलगान
कड्याहून खालीं लोटून प्राण
  होऊन काषाय रङ्ग
  प्रेमांत बेहोश दङ्ग
पावूं गे समाधिसागरीं अन्त !
—अजून सम्पेना वैशाख हन्त ! ८

**माधव जूलियन्**

# अभिसारिका

[ जाति—अभिसारिका ]

नवतिच्या बहरामधिं बालिका
करूनी साज तऱ्हेचा निका
चालली लगबगां कोठें अभिसारिका ? १

कोणता राजहंस मानसीं
निघाली ज्यास बघाया अशी ?
बेपर्वा विलसे धुन्द मुखाचा शशी ! २

महती नच रम्भाकलिज्याची
-उज्ञी कान्ति मुलायम ज्याची
ही कलावती हंसीच भाव तेजाची. ३

भेटति दिनरजनी, या काळीं
निळसर घातळ खडिचें त्याली
सन्ध्येची लाली पसरे गालीं भालीं. ४

पुढें तिज ओढी रम्यायती,
वायुच्या लहरीपरि जाय ती
थबकती बघुन तिज हरिणें मृदुकाय तीं ५

भागुनी विकल होय तनुलता
-स्त्रीची कुसुमासम मृदुलता
लागतां दृष्टि कोमेजे फुलतां फुलतां ६

तोंच ये वंशततींतुन शीळ
उल्लसित होय सती श्रमशील,
मनिं म्हणे 'राजसा जवळच तूं असशील'. ७

जिवाला अतर्क्य ही लागणी,
मनाची तनूपुढें धावणी
भेटला काय तिज कुठें जिवाचा धणी ? ८

दिसे तिज कोणाची साउली ?
लागती कोणाच्या चाहुली ?
ती क्षितिजीं भासे जणुं छायाबाहुली. ९

ऐशी प्रीतिरसाची भेली
नादें दूर कडेला गेली
पडली का ? न दिसे, का कुणि तिजला झेली ? १०

'भेटी जिवाशिवाची पडली,
ओळख युगान्तरींची पटली
हा स्वर्भूसङ्गम पहा !' अश्रणी वदली. ११

माधव ज्यूलियन्

## पत्रांतील फुलें

[ सुनीत ]

उद्यानीं सुकुमार जातिकुसुमें वाग्रूसवें डोलती
हासोनी हसवीत सद्गुणबलें अभ्यागतां वन्दिती
लोकांनीं सगळ्या सुगन्ध लुटुनी नेला जरीही घरीं
होतो तत्तनुचा उणा न किमपी, आनन्द त्यांतें वरी
रात्रींचा जरि तारकागण नभीं स्पर्धा तयांची करी
होई पूर्ण पराभव; प्रकटतो आमोद कोठें तरी.
पृथ्वी या कुसुमामुळें बनतसे स्वर्गाहुनी मोहक
भेदाभेद न, एकजात सकला होतें प्रमोदें सुख !!

थोडीं घेउनि तीं पवित्र सुमनें माला नवी गुम्फुनी
द्यावी वाटत पत्रिका–सुचतुरा–दूती करीं धाडुनी
तों बोले रमणीय मूर्ति मनिंची, " तोडूं नको तीं फुलें
त्यांना प्रेमनिदर्शनास्तव नको दूरी कराया बळें "
राहो प्रेम असें अखण्ड हृदयीं, कां पाहिजे वाच्यता
आपोआप परस्परांस कळते वाऱ्यांतुनी हृत्कथा !

इसलाम्पूर, २८ ऑगस्ट १९२५ मनोरमा रानडे

## प्रेमांतील अद्वैत

[ सुनीत ]

प्रीती दोन मनांस एक करिते काव्यांत मीं वाचिलें
नाहीं मान्य परी मला गमत तो सङ्केत काव्यांतला
कान्ते, या गुरुवेदना प्रसविंच्या तूं एकली साहशी
दारीं स्फुन्दनशब्द ऐकत तुझा वेड्यापरी मी उभा
काव्याची सहकम्पना कुणितरी दावा कवींनो, मला
कोठें आणि सहानुभूति तुमच्या त्या प्रेमगीतांतली
ही माझी सहधर्मिणी तळमळे पाण्याविना मासळी
या दुक्खानुभवीं न मी परि तिच्या, हें दुक्ख मातें खरें !
तूं माझी व तुझाच मी जिवलगे ! दुक्खांत सौख्यांत वा
प्रेमें जीवन व्यापिलें नभ जसें आषाढमेघीं तसें;
आहे हा पडदा परी प्रकृतिचा दोन्ही मनांच्या मधें
झालों दूर अहा समीप असुनी कीं चक्रवाकांपरी
आतां घेइल जन्म जो चिमुकला राजा गडे आपुला
तो माझा व तुझा, मिळेल उभयां अद्वैत त्याच्यामधें

पुणें, १ फेब्रुवारी १९२६ विठ्ठलराव घाटे

## बाळशिवाजीस

[ जाति—अभिमन्यु आणि माधवकरणी मिश्र ]

तुझ्या डोळ्यांत आज पाहिलें मीं
लाडक्या नवल एक नामी
तरल कल्पना आल्या गेल्या तशाच ज्या उडुनी
पाहिल्या त्याच तुझ्या नयनीं १

तुझ्या ओंठांत आयकिलें बा मीं
राजसा, गान एक नामी
ब्रह्मानन्दीं अस्फुट गायन जें हृदयीं स्फुरलें
तें तुझ्या ओंठांवर दिसलें २

तुझ्या जोमांत आज पाहिलें मीं
शिवाजी, चित्र एक नामी
अभिनव भारतभूच्या भावी ओजाची ग्वाही
पाहिली तुझ्या बालदेहीं ३

पुणें, २० ऑगस्ट १९२६ विठ्ठलराव घाटे

## बुल्बुलास

[ जाति—प्रणयप्रभा ]

बुल्बुला रडशि कां बसुन दुरी ?
ही अशी प्रतीक्षा फोल पुरी ! ध्रु०

गुलाबकालिका ही बघ फुलली
गन्धविभ्रमें बोलवि जवळी
ऊठ, घाल झड, हृदयीं कवळीं
कण्टकभय का सले उरीं ! १ बुल्बुला०

कण्टक सन्तत मजही छळतो,
रुधिर न, हा हृद्रङ्ग उधळतो,
अन्तरङ्गकल उगिच न कळतो,
मित्रच हा कृति जरि असुरी ! २ बुल्बुला०

गुलाब कण्टकहीन असेना,
सुळाकडे ने वसन्तसेना,
स्वर्गहि मेल्यावीण दिसेना
मर ! मरतां तुज वरिल हुरी ! ३ बुल्बुला०

[ बुल्बुल गुलाबावर अनुरक्त असतो हा एक सर्वसामान्य फार्शी कविसङ्केत आहे; आणि हुरी ही हुतात्म्याचें बेहेस्तांत स्वागत करणारी स्वर्गाङ्गना होय. ]

माधव जूलियन्

## निराशेंतली इच्छा !

आत्म्याचा हृदयैक बन्ध तुटतां वाटे नको हें जगत्
तारे हे न, भुतें नभीं प्रहसतीं वेडीपिशी पाहुनी
कालाला महती चढे उगवता भानू, न सम्पे कधीं
कां घेई न परी मलाच कुहरीं या घोर पन्थांतुनी ?
सङ्गीतामधलीं फुलें विकसलीं जीं पूर्वि रम्याधिक
तीं आतां चुरगाळुनी महितलीं वायूच नेई कुठें
सारङ्गीतिल मञ्जु गान सरलें, तारा तद्या गन्जल्या
वायू ओरडतो भयाकुल वनीं त्यालाहि ये विकृती !
गुम्फोनी रमणीय नील सलिलीं नक्षत्रमुक्तावली
द्यावी स्वर्गसमानता अवनिला, होती मनःकल्पना

सूत्रें मात्र उरोनि, [illegible] कुठें मुक्ता नभीं लोपल्या
प्राणज्योति विझोनि भीषण तनू वाटे असे राहिली
रात्रींच्या पडद्यांतुनी बघतसे तो सूर्य वृक्षावरी
आलें दाट धुकें, वरी पसरलें, पर्जन्यही पातला
सम्पोनीहि विहङ्गकूजित भयत्रस्ता धरा जाहली
निःश्वासप्रलयें जगत् लुलित हो देवी उषेच्या तदा !
गाणीं सोन्मद गाइलीं गिरिवरी क्रीडे जधीं चञ्चला
त्यांचा प्रेमगभीर अर्थ कळला नाहींच कीं मानवा
अर्थानर्थज ताप साहुं कशि मी ? आतां प्रभो सोडवी !
दीनाक्रन्दन ऐकुनी रसमया ! मृत्यो ! पथा दर्शवी !
संसारीं वसुनीहि जाणुं सहसा अद्वैत तत्त्वस्वयें
लोकीं होउं निदर्शन प्रकृतिचें इच्छा कधींची असे
राहे नीरव बांसरीहि अधरीं निर्वात हस्तधृत
तैसें होउनि, नन्दनीं परतल्या उत्तुङ्ग त्या कल्पना
आतां गात सदैव येथ बसणें सत्प्रेमगीतावली
विश्वाच्या कटु कल्पना न गणुनी मत्स्वैरसृष्टींतलीं,
जेव्हां येइल कालपाश मजला सप्रेम उच्चारित
आनन्दें मधु नाम..................!!!

पुणें, १२ फेब्रुवारी १९१४

**मनोरमा रानडे**

## ऐकव तव मधु बोल

[ जाति—गोविन्द ]

ऐकव तव मधु बोल, कोकिळे, ऐकव तव मधु बोल्
कोकिळे, ऐकव तव मधु बोल् ॥ ध्रु०॥
नकोत मजला मैना, राघू, साळुङ्की, चण्डोल्,
नकोत मजला विविध सुरांचे कृत्रिम ते हिन्दोल् १

एक तुझा स्वर साधा सुन्दर वटि मज बिनमोल्
वसन्त नाहीं अजुन सम्पला, कां झालीस अबोल् ? २
सुखें वसन्तासङ्गें जा मग पहावया भूगोल्
गा शेवटचा बोल लपूनहि पर्णांमाजीं खोल् ३
पाहिन नन्तर वाट वर्षभर दाबुन चित्त विलोल्
नको करूं पण आस एवढी जातां जातां फोल् ! ४

माधव जूलियन्

## मैत्रीची स्मृति

[ सुनीत ]

मैत्रीही मज आज सान्त दिसते जैशा जगीं वस्तु या,
अट्टाहास करून मी दिन किती वांचेल ही यापुढें ?
मीही क्षीण पडें रुतून हृदयीं लाखों विषारी सुया,
येईल क्षण तोहि, शान्त पडुनी जाईल हें बापुडें
होता एक असाहि काळ, म्हटलें उल्हासुनी आपण,
'दावूं विक्रम, मैत्रिकी; झडवुनी लोकीं यशोदुन्दुभि'
कीर्तीचा पडसाद त्या श्रुतिपथीं येई अजूनी पण
गेलें तें, गमतें न ज्याविण जगीं कांहीं खुमारी खुबी.
गेलें सर्व ढगाळुनी नभ वरी, फुन्दांत फुन्जे नदी,
गेले अन्धुकुनी दुरील गिरि ते, झिम्झीम वर्षा पडे,
सन्ध्या होय समाधिशान्त भंवती, तत्राप रन्जे न धी,
जाई मी नगरास सोडुन पुढें-कोठें व कोणाकडे ?
वेशीच्या जवळी परन्तु सुहृदा, भेटून जातां तुज
काव्यात्मत्व जुनें तुझें स्मरुन घे हें एक भावाम्बुज.

माधव जूलियन्

# बन्दिवान गरुड

[ जाति—चिमणी ]

पडसी कारागारीं । गरुडा, घेशिल कोंवि भरारी ?
झुन्ज झुन्जुनी देवांनाही
तुवांच केलें त्राहि त्राहि
निनादती ह्या दिशांत दाही
अजुनी कीर्तितुतारी । गरुडा, घेशिल कोंवि भरारी ?
उचम्बळे जरि ती पूर्वींची
नसानसांतुन विक्रमवीची
नभा गवसणी घालायाची
लङ्गर परि पदिं भारी । गरुडा, घेशिल कोंवि भरारी ?
तव सञ्चारें व्योमकपाटीं
विहगवरांच्या लपल्या कोटी
क्षुद्रहि साम्प्रत परि घुङ्गुरटीं
येतिल डिवचूं हारी । गरुडा, घेशिल कोंवि भरारी ?
जन्मजात तूं व्योमविहारी
जखडुनि पडसी परि गिरिशिखरीं
बद्ध होइ तव कर्तबगारी
स्थिति ही हृदयविदारी । गरुडा, घेशिल कोंवि भरारी ?
स्मरुनी घडिघडि गत विभवाला
देखुनि आल्या आपत्काला
जिणें मरणसें होइल तुजला
कोण विमोचनकारी ? गरुडा, घेशिल कोंवि भरारी ?

येरवडा, २ नोव्हेंबर १९२६ यशवन्त

## गाउं त्यांना आरती

[ वृत्त—पाण्डव दिडकी ]

सङ्गरीं वीराग्रणी जे धैर्यमेरू सङ्कटीं जन्मले या भारतीं
राष्ट्रचक्रोद्धारणीं कर्णापरी ज्यांना मृती गाउं त्यांना आरती
कोन्दला अन्धार मार्गीं खांच खड्डे मातले तस्करांनीं वेष्टिलें
सम्भ्रमीं त्या जाहले कृष्णापरी जे सारथी गाउं त्यांना आरती
स्वार्थहेतूला दिला सङ्क्षेप ज्यांनीं जीवितीं तो परार्थीं पाहती
आत्मविस्तारांत ज्यांच्या देशही सामावती गाउं त्यांना आरती
देश ज्यांचा देव, त्यांचें दास्य ज्यांचा धर्म हो दास्यमुक्ति ध्येय होय
आणि मार्कण्डेयसें जे जिङ्किती काळाप्रती गाउं त्यांना आरती
देह जावो, देह राहो, नाहिं ज्यांना तत्क्षिती लोकसेवा दे रती
आणि सौभद्रापरी देतात जे आत्माहुती गाउं त्यांना आरती
जाहल्या दिङ्मूढ लोकां अर्पिती जे लोचनें क्षाळुनी त्यांचीं मनें
कोटिदीपज्योतिशा ज्यांच्या कृती ज्यांच्या स्मृती गाउं त्यांना आरती
नेटकें कांहीं घडेना काय हेतु जीवना या विचारीं मन्मना
बोधितों कीं एवढी होवो तरी रे सत्कृती गा तयांची आरती

येरवडा, ८ जून १९२६ यशवन्त

## उपासक

[ जाति—माधवकरणी ]

धिण्ड तुझी काढितों, फिरवितों तुज दारोदार
प्रतीष्ठा मिळवाया लोकीं
त्वत्प्रतिमेच्या भाण्डवलावर माझा व्यापार
शब्दशर असे कुणी रोखी

परन्तु माझ्या भाव मनींचा आकळतो तुजला
सत्य ना लपे त्वदालोकीं
अङ्गारे लावून पाहणें दाह जनीं शमला
हेतु ना दुजा ध्येयफलकीं
चालवितों व्रत तव भक्तीचें, सुलभ जना गमतें
जनांची वरवरची दृष्टी
तयार व्हाया परि अङ्गारे अन्तरङ्ग जळतें
आंतली ज्ञात कुणा सृष्टी !
तव मूर्तींचे वागवितों मी माथां पेटारे
फुगीरहि झोळी कांखेला
दण्डावरचे आसूडाचे परन्तु फटकारे—
तयांचा तर्क कुणीं केला !
म्हणोत कांहीं कोणीही परि लागुन फुङ्कर तो
विझो हा नच नन्दादीप
पदर आड धरि तुझ्या कृपेचा विनन्ति ही करितों
तूंच कीं मज सकलाधीप

यशवन्त

## मनाची आग

[ वृत्त—आनन्दकन्द ]

ही आग पेटलेली माझ्या सभोंवताली
हैराण या जिवाची होते किती कहाली

सारावया तमाला येईल तेज, वाटे
ज्वाळांत या परन्तू माझी तनू जळाली

माझ्या मनीं कळ्यांनीं कोठें जरा फुलावें
जावें परी जळूनी केव्हां असें अकालीं

कीं पालवून आशा, आनन्द मोहरावा
तों कोवळे मुगारे अङ्गार हाय ! जाळी

स्वार्थांत लोभलेले हे कीट जीव खाती
घ्यावें कुणास आतां, जीवास कोण वाली ?

देऊनि वीष मातें, पीयूष ओपण्यातें
हें साङ्गती; न पाहे अश्रू कुणीच गालीं

किंवा जळून ऐसें पावित्र्य मेळवावें,
अन्यास तेज द्यावें, चाले तरी तयारी ?

रहिमतपूर, २ मे १९२५ — गिरीश

## हुरहूर

[अभङ्ग]

होतसें कां ऐसें चुकल्यासारखें — जाहलें पारखें काय नेणें !
हुरहुर वाटे सान्जावतां भोंतीं — अन्धारली ज्योति अन्तरींची
काळोखाचें रान माजे मजवर — भोंवतालीं वर, काजळलें
वारा गुणगुणे गीत कांहींतरी — अन्तरीं बांसरी मूक झाली !
बसून कातळीं इथें मी एकला — कुठें पाहूं तुला दिगन्तरीं ?

पुणें, १८ फेब्रुवारी १९२७ — गिरीश

# मृत्यूस

[ वृत्त—भिल्लीण दिंडकी ]

जीवास सखा तूंच, खरा आश्रयदाता कीं प्रेमळ माता
कां घोळ असा घालिसि ? ये धांवत मृत्यू! घाली न हुतूतू.
हें जीवित कीं सासर, माहेर जिवाला तूं एक जिव्हाळा
कां चाळवण्या दाविसि ? दे गाढ भिठी तूं घाली न हुतूतू.
आलिङ्गन देतील परी दृष्टि हितार्थी ऐशी जनरीती
पेमांत तुझ्या स्वार्थि नसे कांहींच हेतू घाली न हुतूतू.
अहाळ उबेचे जरि हे हातच हातीं सोसे धग ना ती
यांहून बरा गार तुझा हात, परन्तु घाली न हुतूतू.
दुर्दैवटणत्कार बसोनी मन मेलें पिन्जून निघालें.
लावून अतां वेळ नको अन्तर कांतूं घाली न हुतूतू
ही आग सभोंतीं, श्रम केले विझवाया गेले परि वांया
ना थेम्ब म्हणावाच जरी आणिक ओतूं घाली न हुतूतू.
आले कढ जे आजवरी ते निववीले तें धैर्य निमालें
ये धांव, अतां आधण जाणारच ऊतूं घाली न हुतूतू.
संसार-महासिन्धु फिरे पाहुन दृष्टी, ही जर्जर यष्टी;
नेसील परी पैलथडी तूं जणुं सेतु घाली न हुतूतू.
मार्गांत—नको तीच—कधीं सोबत येई सन्तापद होई
वाटे तरि तैं कां न तुटे जीविततन्तू ? घाली न हुतूतू
मुक्काम नको येथ अरत्रीं न परत्रीं या भीषण रात्रीं
फुङ्कून शिटी हालवि हातांतिल केतू घाली न हुतूतू.
धाडी फिरुनी येथ कधींही न प्रवासा ने स्वीय निवासा
हें दान तुला मागतसें, बोल 'तथास्तु' घाली न हुतूतू

चिन्चवड, १८ सप्टेम्बर १९२५ यशवन्त

## गौरीशङ्कर आणि मानव

[ कांहीं वर्षांमागें गौरीशङ्कर गांठण्याचा कांहीं धाडसी ज्ञानपिपासु इङ्ग्रजांनीं दोनदां प्रयत्न केला! दोघे त्यांत दगावले. निसर्गाचें अद्यापि अज्ञात असें अमर्याद स्वरूप व मानवाची तें जाणण्याची अमर्याद तृष्णा यांचें हें उत्तम उदाहरण आहे. पहिल्या भागांत वरवर चढून जवळ येणाऱ्या मानवास गौरीशङ्कर तिरस्कारानें खालीं लोटीत आहे. दुसऱ्या भागांत मानव नम्रपणें पण निश्चयानें त्याला उत्तर देत आहे.]

— १ —

[ जाति—झम्पा ]

थाम्ब, खालीं उतर, परत जा परत जा !
क्षुद्र जीवा तुझा गर्व वायां ! ॥ ध्रु० ॥

मन्त्रदर्शी मुनी आदरें मज नमुनि
सिद्ध झाले उषःसूक्त गाया १

या हिमस्थण्डिलीं भानुकिरणावली
कांपते होत जड बधिर काया २

वायु चढतां वरी गुदमरे अन्तरीं
घसरुनी खालतीं धरित पायां ३

वरुण अभिषेक धरि, आरती वीज करि
माळ घाली गळां इन्द्रराया ४

सागराधीश तो चळचळां कांपतो
खण्डणी धाडितो तोयवाया ५

क्षुद्र तूं! मूढ तूं! ज्ञानदर्पान्ध तूं!
उतर जा! हट्ट कां धरिशि वायां? ६

## — २ —

[ जाति—गिरिराय ]

कां आडविशी गिरिराया, रे ॥ ध्रु०॥
देह आमुचा जावो राहो, आलों तुज भेटाया १
ज्ञानमहोदधि अफाट भरला, उतरलोंत पोहाया २
दुर्बल देहांतिल दुर्दम मन सिद्ध विश्व जिङ्काया ३
अनन्त अज्ञाता उकलाया अनन्त आकाङ्क्षा या ४
खुलें कुरण आम्हांस जगाचें धरतविशीं कां वायां ? ५
जिकडे तिकडे ज्ञानरूप परमेश खुणवितो 'या ! या !' ६
चढेल तोची पडेल, आम्ही सदा तयार मराया ७
सोड हिमाद्रे खुशाल आतां, आलों तुज गांठाया ८

विठ्ठलराव घाटे

## हाकाटी

[ अभङ्ग ]

कशासाठीं ? कोणासाठीं आंत चालली हाकाटी
हृदयींची आस आस चूर झाली सावकास
प्रीतिकीर्तीचे डोलारे गेले कोसळून सारे
जनतेचा जो भुकेला तिनें केला अर्धामेला
झाली जिवाची चाळण धीर चालला गळून
बण्डखोर तारुण्याचें रक्त नसोनसीं नाचें
परी क्षीण माझ्या मनीं आस कोठें सञ्जीवनी ?

[ २ ]

पुस्तकींच्या माणकांच्या व्यवहारीं होती काचा
व्योमचुम्बी कल्पवृक्ष कोळपून होती रूक्ष
कल्पनेच्या स्वर्गांतून खालीं आदळे तरुण
पूज्य येथें एक 'माया' तिच्यावीण सारी माया
कृपा हिची होई तर पङ्गु उल्लङ्घी डोङ्गर
मुका होई बृहस्पती मिळे पाप्याला सद्गति
सर्व शक्तींची जननी हीच भवींची तरणी

[ ३ ]

मर्दें अव्हेरिलें हिला आतां प्रभाव पाहिला
आतां पाहिला प्रभाव कांहीं लागेना निभाव
सत्ता करी तेंच सत्य मान डोलविणें पथ्य
करी कायदा हुकूम कैसा म्हणावा जुलूम ?
लोकशाही येथें ओंठीं हांव सुल्तानीची पोटीं
प्रेम सुवर्णाच्या मागें जोडी जीविताचे धागे
गर्द झालीं येथें ध्येयें आणि वेदान्तप्रमेयें

[ ४ ]

स्वत्वमणि विकूनिया नको घेणें ही दुनिया
दील माझा राहो पाक होवो आकाङ्क्षांची राख
बन्द होऊं द्या वाजणें थोरवीचीं शहाजणें
विस्मृतीच्या गङ्गेमाजीं देहनाम लोटा आजीं
दोन रोज आक्रोशाया नको मुलाम्याची माया
मग काय हवें तरी ? तेंच कळेना अन्तरीं
आंत बाहेर हें सुनें वाटे नको नको जिणें

[ ५ ]

तुकोबाच्या पाण्डुरङ्गा भावनेच्या अन्तरङ्गा
बोरी हीच चन्द्रभागा पण्ढरीही हीच जागा
तुम्ही त्रैलोक्याचे राजे तुम्ही मायबाप माझे
झाला उशीरां आठव तरी येऊं द्या हो द्रव
उचलून घ्या हो मला घट्ट उराशी आंवळा
तेंच माझें परम्धाम सुखी जेथें आत्माराम
मग थाम्बेल हाकाटी— कशासाठीं ? कोणासाठीं ?

माधव जूलियन्

## दोन अभङ्ग

काय करूं देवा, ज्ञानाचा हा भार वाहुनी बेजार झालों बापा
वाटते चुरावे पाय माउलीचे परी या सङ्कोचें वांकवेना
गरिबांच्या काजीं वाटतें भागावें परी तयांसवें बैसवेना
वाटे तुझें नांव गावें वाडें कोडें परी चौघांपुढें गाववेना
देखतां राऊळ वाटतें वन्दावें परी हात भावें जोडवेना
धांव घेई मन पायांशीं तांतडी बुद्धि मागें ओढी धाववेना

२

अरे सोङ्गाड्या सोङ्गाड्या काय सोङ्ग घेशिल गड्या !
यशोदेला फुटला पान्हा हरि, झालाशी तूं तान्हा
सखूबाईच्या मन्दिरीं हरि झालाशी अन्तुरी
दामाजीची करण्या फेड विठो झालाशी तूं घेड
जुनीं सोङ्गें जुन्या बरीं नवें दाव आम्हां हरी !
भव्य सुन्दर रूप घेईं माथा तरीच ठेविन पायीं

विट्ठलराव घाटे

# पाणपोई

[ वृत्त—वारुणी ]

येइ भाई येथ पाही घातली ही पाणपोई
धर्मजाती कोणती ती भेद ऐसा येथ नाहीं
संसृतीचा हा उन्हाळा तल्खली होई जिवाची
स्वेदबिन्दू अश्रुधारा याविना पाणीच नाहीं
वायुवीची भोंवतीं आन्दोलुनी त्या वञ्चिताती
झोम्बती अङ्गीं झळा अन् मूर्छना ये ठायिंठायीं
साउली नाहीं कुठेंही, तापतो मार्तण्ड डोईं
श्रान्त पान्था ! बान्धली ही तूझियासाठीं सराई
आद्य जे कोणी कवी तत्स्फूर्तिच्या ज्या सिन्धु गङ्गा
आणिल्या वाहून खान्दीं कावडी त्यांतील कांहीं
पान्थसेवासाधनीं हें व्हावयातें गार पाणी
मृत्तिकेचे मात्र माझे कुम्भ, ही माझी नवाई
ओन्जळी, दो ओन्जळी, आकण्ठ घेई वा पिऊनी
हो जरा ताजा तवाना, येउं दे सामर्थ्य पायीं
पावतां तृप्ती मना, सञ्चारतां अङ्गीं उमेदी
जो दुवा देशील पान्था तेवढी माझी कमाई.

येरवडा, १२ मे १९२७ यशवन्त

3843.